# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांकः संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/०५४ दिनांक : 11 JAN 2019

## परिपत्रक

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" पूर्ण करण्याबाबत...**

**संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०१/२०१९ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्र. ७ मधील निर्देशानुसार सादर.**

विषयांकित प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरिता प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" अद्यापही बहुतांशी शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी पूर्ण केलेली नसल्याचे निर्दशनास येत आहे, तथापि महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन संबंधीत महाविद्यालयांना शेवटची संधी म्हणुन दिनांक १२/०१/२०१९ ते २१/०१/२०१९ पर्यंत रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) दंड भरण्याच्या अटींवर मुदतवाढ देण्याचे प्राधिकरणाने निश्चित केलेले आहे.

तथापि, तद्नंतर सदर प्रक्रियेसाठी जी शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये "नोंदणी प्रक्रिया" करण्यास असमर्थ ठरतील अशा महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांच्याबाबत शासनाला अवगत करण्यात येईल तसेच संबंधीत महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने उचित कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.**

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,-
संचालक तथा नोडल अधिकारी, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण / वैद्यकीय शिक्षण / आयुष शिक्षण / कृषी शिक्षण / कला शिक्षण / मत्स्य व दुग्ध शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,
मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे.

प्रत,-
निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.